# बालिकेच्या अत्याचाऱ्याच्या निषेधार्थ दर्यापूरात संताप

## शहर बंदला संमिश्र प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.20 )** – तालुक्यातील येवदा पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या एका खेडेगावात तीन वर्षीय चिमुकल्या मुलीवर 65 वर्षीय नराधमाने केलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ यासह दर्यापूर पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या एका खेडेगावात एका अल्पवयीन मुलीवर अल्पवयीन मुलानेच केलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ आज दर्यापूर बंदचे आवाहन विविध संघटनांच्या वतीने करण्यात आले होते. या



आवाहनाला साथ देत दर्यापूरवासियांनी कडकडीत बंद पाळला.

सोमवार सकाळपासूनच दर्यापूर बंद करण्यासाठी विविध संघटनातील पदाधिकाऱ्यांनी आवाहन केले होते. सकाळपासून दर्यापुरातील ठराविक व्यापार बंद ठेवण्यात आला होता. व्यापाऱ्यांनीसुद्धा स्वयंस्फूर्तीने या बंदला सहभाग देऊन आपली व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवली. दिवसभराचा बंद न राहता एक तासानंतर काही व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने उघडून दर्यापूर बंदला संमिश्र प्रतिसाद दिला होता. डेपो चौकात तर हॉटेल पूर्णपणे उघडे होते. सकाळपासून दर्यापूर पोलिसांनी यावेळी चोख कामगिरी बजावत कुठलाही अनुचित प्रकार घडू दिला नाही. मोर्चेकरांनी यावेळी तहसीलदार रवींद्र कानडजे यांच्यामार्फत राज्य शासनाला निवेदन दिले.

### नराधमाला फाशी द्या!

घटनेतील आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी करण्याचे निवेदन दिले आहे. यावेळी राष्ट्रीय समाज पक्ष भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट शिवसेना शिंदे गट युवा स्वाभिमान पक्ष, शिवसेना उद्धव ठाकरे गट , वैद्यकीय संघटना तालुका सरपंच संघटना यासह विविध सामाजिक संघटनांनी आपला पाठिंबा दर्शविला, दर्यापूर बंद अतिशय शांततेत पाळण्यात आला.



# चेनस्रॅचिंगमधील रायडरसह चौघांना अटक

## गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 ची कामगिरी | चार दुचाकीही जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )** – महिलेच्या गळ्यातील मंगळसुत्र हिसकावून पळ काढणार्या मुख्य आरोपीसह तीन रायडर यांना अटक करण्यात गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 पथकाला यश मिळाले. आरोपींनी शहरातील तिन गुन्ह्यांची कबुली दिली असून, त्यांच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. शेख इरफाने शेख जब्बार (20, रा. गुलीस्ता नगर, अहमदीया मजिदजवळ), शेख समीर उर्फ अमीका नवाब वल्द शेख युनूस (21, रा. छायानगर), शेख फैजान शेख रहीम (18, रा यास्मीन नगर) व सैयद तवेद उर्फ नावेद सैयद आबीद (26, रा यास्मीन नगर चौक) यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. त्यांच्या ताब्यातून चार दुचाकी जप्त केल्या आहेत.

शहर आयुक्तालय हद्दीत गेल्या काही दिवसापासून चेनस्रॅचीगच्या घटना घडत आहे. या अनुषंगाने पोलीस आयुक्त नवीनचंन्द्र रेड्डी यानी सदर गुन्हे उघडकीस आणण्याचे गुन्हे शाखेच्या पोलिसांना आदेशित केले होते. या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 चे अधिकारी व अमलंदार यांनी प्रत्येक गुन्हाचे घटनास्थळाला भेट दिली. त्यावेळी निदर्शनास आले, कि बर्याच ठिकाणी दोन इसम हे दूपारचे वेळेस विरळ भागात पायदळ जाणार्या महीलांचे सोनसाखळी हिसकवून पळून जात आहे. सदर घटनास्थळी असलेल्या सिसीटीव्ही फुटेज व गुप्त माहितीवरून दोन इसमापैकी एक इसम हा सळपातळ व मोठे केस असलेला इसम आहे. हे निदर्शनास आले. या वर्णनाचा सदर इसम हा इकबाल नगर चौक येथे असल्याची माहीती पोलिसांना प्राप्त झाली. त्यानुसार पोलिसांनी 20 जानेवारी रोजी एका इसमाला ताब्यात घेतले. त्यावेळी त्याने त्याचे नाव शेख इरफाने शेख जब्बार असे सांगीतले. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता, त्याने सदर गुन्हा त्याचा साथीदार नामे सैयद नावेदसोबत केल्याचे कबूल केले. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी आरोपी शेख इरफाने शेख जब्बार याला विश्वासात घेवन बारकाईने तपास केला असता त्याने या व्यतरिक्त इतर दोन चैन स्रॅचीग केल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या इतर दोन साथीदारांनाही ताब्यात घेतले.

### या पथकाची कामगिरी

सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, अरून पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट क्रमांक 1 चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलिस उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, पोलिस हवालदार सतीष देशमूख, फिरोज खॉन, सचिन बहाळे, अलीमउददीन खतीब, नाईक पोलीस अमंलदार नाझीमउददीन सैयद, सचिन भोयर, विकास गुडदे, पोलीस अमलदार सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक, रोशन माहुरे, किशार खेंगरे तसचे पोलीस स्टेशन सायबरचे सहायक पोलिस निरीक्षक अनिकेत कासार, पोलीस अमलदार निखील माहूरे, अनिकेत वानखडे यानी केलेली आहे.

### आरोपी शेख इरफानचे तीन रायडर

आरोपी शेख इरफान शेख जब्बार याने तिन चैन स्रॅचीग केल्या असून प्रत्येक घटनेमध्ये गाडी चालवणारे तीन रायडर हे वेगवेगळे आरोपी आहेत. या तिन्ही गुन्हात घटनेच्या वेळी आरोपींनी एमएच 27 एक्स 2387, एमएच 27-एएम 5833 व एका विना नंबर क्रमांकाच्या दुचाकीचा वापर केला आहे.

# ॲड. यशोमती ठाकूर सावित्रीच्या लेकी पुरस्काराने सन्मानित सन्मानित

**पुण्यातील ऐतिहासिक फुले वाड्यात ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते सन्मान**

**विविध क्षेत्रातील मान्यवराची उपस्थिती, अंबा नगरीच्या शिरपेचात मानाचा तुरा**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 20 )** – गेली अनेक दशके विधिमंडळाच्या सदस्य म्हणून शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार तरुण, तसेच महिलांच्या विविध समस्यांवर महाराष्ट्र विधान मंडळात आपला आवाज बुलंद करणाऱ्या काँग्रेसच्या नेत्या व माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांना मानाचा सावित्रीच्या लेकी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे येथील ऐतिहासिक फुले वाड्यात हा सन्मान सोहळा पार पडला, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ॲड. यशोमती ठाकूर यांना शाल श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले, त्यांच्यासह या सोहळ्यात अभिनेत्री अश्विनी गिरी, मुंबईच्या प्रा. भावना पाटोळे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रा. डॉ अनिता पाटील, ठाणे येथील प्रा डॉ. प्रज्ञा आशीर्वाद, लातूर येथील प्रा डॉ. माधवी महाके, नागपूरच्या अनिता मसराम, धाराशिव येथील आदर्श शिक्षिका बबीता महानोर यांचाही सावित्रीच्या लेकी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला, इंडियन स्टूडेंट कौन्सिल तसेच महाराष्ट्र संचालनालयाच्या पुरातत्व विभागाच्या वतीने हा सोहळा ऐतिहासिक महात्मा फुले वाड्यात आयोजित करण्यात आला होता, समाजातील विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने उल्लेखनीय कार्य करून समाजासाठी मार्गदर्शक ठरलेल्या विविध क्षेत्रातील सावित्रीच्या लेकींना पुरस्कृत करण्यात आले होते, राजकीय क्षेत्रातून ॲड. यशोमती ठाकूर यांचाही त्यामध्ये समावेश होता. या सोहळ्यात राजर्षी छत्रपती शाहू



महाराज पुरस्काराचे सुद्धा वितरण करण्यात आले, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव म्हणाले, भारतीय संविधानाने कुणालाही मनमानी व निरंकुश राज्य करण्याची मुभा दिली नाही.

मनुस्मृतीने स्त्रीला स्वातंत्र्य देऊ नका असे सांगितले. सावित्रीच्या लेकी पुरस्काराच्या सन्मान प्राप्त करणाऱ्या लेकिवर आता महिलांच्या उत्थानाची मोठी जबाबदारी आलेली आहे ती त्यांनी पार पाडावी असे मनोगत त्यांनी यावेळी व्यक्त केले, सावित्रीच्या लेकी होणं म्हणजे काय हे तुम्ही नीट लक्षात ठेवायला पाहिजे, स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराच्या विरोधात तुम्ही पेटून उठले पाहिजे येत्या 26 जानेवारीला संविधानाची एक प्रत आपल्या हातात ठेवून राज्यकर्त्यांना तुम्ही प्रश्न विचारला पाहिजे असेही डॉ.बाबा आढाव म्हणाले, तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले, या कार्यक्रमाला समाजाच्या विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.

### देशात आणि राज्यात सर्व काही व्यवस्थित नाही - ॲड. यशोमती ठाकूर

आज देशात आणि राज्यात सर्वकाही चांगले सुरू आहे असे आपल्याला अजिबात वाटत नाही, कार्यक्रम जरी छोटा असला तरी वास्तविकता आपण जगलो पाहिजे, या देशाचा इतिहास बदलणं याचे षडयंत्र आपल्या सोबत होत आहे, आम्ही राजकारणात वावरत असताना या गोष्टींशी जवळून संबंध आला आहे, या गोष्टी का आणि कशा घडल्या हे आम्हालाही कळाले नाही, देशाचा इतिहास, देशाचे संविधान बदलविण्याचे हे षडयंत्र तरुण पिढीने जाणून घेतले पाहिजे, मात्र संविधान वाचविण्यासाठीची जी लढाई सुरू झाली आहे ती आम्ही कधीही सोडणार नाही, आज भावी पिढी समोर फार मोठे संकट उभे ठाकले आहे, त्याची जाणीव सर्वांना झाली पाहिजे, जोपर्यंत देशातील जनता हे आंदोलन आपल्या हातात घेत नाही तोपर्यंत हे असेच सुरू राहणार, जी व्यक्ती आई सावित्रीचा अपमान करते तिचा तिचा या राज्याच्या प्रमुखांच्या हस्ते सन्मान होतो ही खेदजनक बाब आहे, असे मत ॲड. यशोमती ठाकूर यांनी आपल्या सत्काराचे उत्तरा दाखल व्यक्त केले.

# मरणोत्तर देहदान करुन पुर्ण केली आईची ईच्छा

## रुढी, परंपरेला फाटा देत मुलानं घेतला निर्णय



### मुलगी व सुनेनी दिला खांदा



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.20 )**– येथील मराठा सेवासंघाचे माजी तालूका अध्यक्ष किशोर दादाराव सावरकर यांच्या आई सुर्यकांताबाई दादाराव सावरकर यांचे रविवारी( दि.19 ) वृद्धापकाळाने निधन झाले. निधनानंतर कोणतेही सोपस्कार न करता किशोर सावरकर यांनी आईच्या ईच्छेनूसार आईचे पार्थीव डॉ.पंजाबराव देशमुख मेडीकल कॉलेजला दान करत समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला.

अंजनगाव सुर्जी तालूक्यातील कोकर्डा येथील रहीवाशी किशोर सावरकर यांचे कुटूंब पुर्वीपासूनच पुरोगामी विचाराची कास धरणारे कुटूंब म्हणुन ओळखले जाते. किशोर सावरकर हे अनेक वर्षे मराठा सेवा संघाचे तालूका अध्यक्ष राहीले आहेत. त्यामुळे महापुरुषांच्या विचाराचा पगडा हा त्यांच्या कुटूंबावर होताच आणि तो त्यांनी प्रत्यक्षात उतरवलासुद्धा, किशोर सावरकर यांच्या आईने स्वत:हुन देहदानाची ईच्छा व्यक्त केली होती. हे विशेष, जवळच्या नात्यातील व्यक्तींचे निधन झाल्यानंतर त्यांचा अंत्यविधी किंवा अंत्यसंस्कार करताना कुटुंबीय अतिशय संवेदनशील असतात.

आपल्या आईवर अंत्यसंस्कार करण्याकरिता समाज बांधवांचा आग्रह असताना सावरकर कुटुंबियांनी आईचे मरणोत्तर देहदान केले आहे. विशेष म्हणजे अंत्ययात्रेच्यावेळी किशोर सावरकर यांची बहीणी व पत्नीने खांदा देत एक नविन पायंडा आणि नविन विचार समाजाला दिल्याची भावना व्यक्त होत आहे. सावरकर यांच्या कुटूंबातील हे दुसरे देहदान असून मृत्यूनंतर देह हा जाळून, पुरुन नष्ट करण्यापेक्षा तो शैक्षणिक कार्यासाठी उपलब्ध करून देणे, हे खऱ्या अर्थाचे सामाजिक भान आहे.

कुटुंबातील या विचारामुळे अनेक चांगले डॉक्टर निर्माण होतील आणि येर्णाया पीढीसाठी त्याचा उपयोग होईल असे विचार यावेळी श्रध्दांजली व्यक्त करतांना मान्यवरांनी काढले.

### तेरवी व इतर सोपस्कारही नाही

तेरवी आणि ईतर कार्यक्रमासाठी लागणारा खर्च कोकर्डा येथील एखाद्या सामाजीक कामासाठी देण्याचा व देहनानंतर कोणतेही कर्मकांड न ठेवता आजच दूखवटा संपल्याचे जाहीर केल्याने सावरकर कुटूंबांचे सर्वच स्तरातून कौतूक करण्यात येत आहे.

# महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करा!

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.20 )**– कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात इतर खाजगी क्षेत्र, इंटरप्रायजेस, सहकारी संस्था, क्रीडा संकुल, प्रेक्षागृह, मॉल्स, अशासकीय व संघटना, ट्रस्ट, रुग्णालय, शुश्रूषालय, क्रीडा संस्था, वाणिज्य, शैक्षणिक, औद्योगिक कार्यालय, संस्था इत्यादीमध्ये 10 पेक्षा जास्त कर्मचारी असल्यास अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करणे बंधनकारक केले आहे. अन्यथा अंतर्गत समिती स्थापन न करणाऱ्या कार्यालयांचे परवाना रद्द किंवा व्यवसाय पुढे सुरु ठेवण्यास मज्जाव करण्यात येईल.

अंतर्गत तक्रार समितीमध्ये किमान 5 सदस्य असावेत, समितीची अध्यक्षा महिलाच असावी, समितीमध्ये 50 टक्के पेक्षा जास्त महिलांचा समावेश असावा व एका अशासकीय सदस्याचा समावेश करण्यात यावा. कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम- 2013 मधील कलम-26 नुसार जर एखादया मालकाने (अ) अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली नाही (ब) कलम 13, 14 व 22 नुसार कारवाई केली नाही (क) या कायद्यातील व नियमातील विविध तरतुदीचे व जबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास मालकाला 50 हजार रुपयापर्यंत दंड होईल तसेच हाच प्रकार पुन्हा केल्यास परवाना रद्द, दुप्पट दंड अशी तरतुद आहे. सदर अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी व कार्यवाही करण्यासाठी 10 पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या सर्व शासकिय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापना यांनी आपल्या कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती दि. 27जानेवारी2025 पर्यंत गठित करून तसा फलक कार्यालयाचे दर्शनी भागात लावावे. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिलेले आहेत. तरी सर्व कार्यालयांमध्ये तात्काळ अंतर्गत तक्रार समिती गठित करण्यात येवून तसा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, अमरावती यांचेकडे dwcdoamravati @gmail.com यावर करावा. तसेच संपर्क क्रमांक 0721-25775911 यावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

### महिला व बाल विभागाचे आवाहन

# अमरावती जिह्यातील पदाधिकारी जाहीर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 20 )**– शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने अमरावती जिह्याकरिता पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात ही माहिती देण्यात आली आहे. आमदार गजानन लवटे जिल्हा समन्वयक (अमरावती - जिल्हा), अभिजीत ढेपे जिल्हा संघटक (अमरावती जिल्हा), पराग गुडधे - जिल्हाप्रमुख (अमरावती, बडनेरा, तिवसा, दर्यापूर विधानसभा), मनोज कडू - जिल्हाप्रमुख (धामणगाव व वरुड मोर्शी विधानसभा), नरेंद्र पडोळे जिल्हाप्रमुख (अचलपूर व मेळघाट विधानसभा), प्रवीण हरमकर शहरप्रमुख (अमरावती विधानसभा), संजय शेटे- शहरप्रमुख (बडनेरा विधानसभा).

# माजी सरपंच सुधाकर मानकर यांचा दिल्ली येथे राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव

## अटल भूजल च्या उत्कृष्ट कामाबद्दल सन्मान

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.20 )** – तालुक्यातील अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतपैकी जरूड ही एक ग्रामपंचायत आहे. या गावचे माजी सरपंच सुधाकर मानकर यांच्या अटल भूजलच्या उत्कृष्ट कामाबद्दल दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्याने देशाचे महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार असल्याचे माजी सरपंच सुधाकर मानकर यांनी दैनिक महासागरशी बोलताना सांगितले.

ते या सोहळ्यासाठी 24 जानेवारीलाच जरूड येथून दिल्लीकरिता जाणार असल्याचे समजते. त्यांनी त्यांच्या सरपंचाच्या कार्यकाळात जरूड गावाला तंटामुक्त गाव समिती, कोरोना मुक्त, आर आर आबा स्मार्ट, महाराष्ट्र भूषण, सरपंच ऑफ द इयर लोकमत पुरस्कार, सरपंच सम्राट पुरस्कार असे एकूण 11 पुरस्कार व तीन कोटी 25 लक्ष रुपये पुरस्कार म्हणून त्यांनी आपल्या पाच वर्षाच्या कार्यकाळात जरुड ग्रामपंचायतीला मिळवून दिले. त्यांच्या या कार्याची



दखल गावकऱ्यांनी सुद्धा घेतली होती त्यांनी सुद्धा सरपंच सुधाकर मानकर यांचा नागरी सत्कार सव्वीस नोव्हेंबर 2023 ला उत्क्रांती शाळा जरूर येते भव्य प्रांगणात हजारो नागरिकांच्या उपस्थितीत केला होता हे विशेष.

काही माणसं जन्माने जातीने मोठे असतात तर काही माणसं कर्माने व कर्तुत्ववाने मोठी असतात जन्म कोणत्या घरी झाला कोणत्या कुटुंबात झाला. यापेक्षा जन्मानंतर माणसाने त्यांचे आयुष्य कसं घडवलं तो कसा जगला याला जास्त महत्त्व असते. सुधाकर मानकर यांचा जन्म एका सर्वसाधारण मानकर कुटुंबात 5 मे 1962 ला जरूड या गावात झाला. वयाच्या 19 व्या वर्षी म्हणजेच 1981 ला ते भारतीय सैन्यामध्ये भरती झाले.

सैन्यामध्ये अतिशय निष्ठेने कर्तव्य पार पाडल्यानंतर ते सेवानिवृत्त झाले सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना जरूडच्या सरपंच पदाची धुरा त्यांच्यावर आली पाच वर्षातच त्यांनी जरूर चा चेहरा, मोहरा बदलविण्यात ती यशस्वी ठरले. आजपर्यंतच्या इतिहासात 'न भूतो न भविष्यती' असा सरपंच म्हणून त्यांचे नाव तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यामध्ये घेतल्या जाते. आणि म्हणूनच त्यांचा येतोचित सत्कार देशाचे महामयम राष्ट्रपती व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 26 जानेवारीला दिल्ली येथील लाल किल्ल्यावर झेंडावंदन झाल्यानंतर सपत्नीक सत्कार करण्यात येणार असल्याचे खूप माजी सरपंच सुधाकर मानकर यांनी 'दैनिक महासागर' शी बोलताना सांगितले . ते पुढे म्हणाले की हा सत्कार माझा नसून संपूर्ण जरूडवासियांचा सत्कार असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले आहे. त्यांच्या या होऊ घातलेल्या सत्कार बद्दल गावातीलच नव्हे तर संपूर्ण तालुक्यातील नागरिकांनी शुभेच्छा दिल्या आहे.

# निंभी टोलनाका रद्द करण्याकरिता एल्गार


## निंभी टोल कृती समितीचा इशारा

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )**– मोर्शी मार्गावर निंभी येथील टोल नाका त्वरित रद्द करण्यात यावा, अन्यथा निंभीच्या टोल नाक्यावर तीव्र स्वरूपाचे हल्लाबोल आंदोलन करण्यात येईल, असा इशारा एका निवेदनातून सोमवारी (ता.20) निंभी टोल कृती समितीच्या वतीने देण्यात आला. कृती समितीने जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना निवेदन दिले.

नांदगाव पेठ ते मोर्शी या राष्ट्रीय महामार्गावर निर्मीत



करण्यात आलेल्या निंभी टोलनाक्यावरून वाहनधारकांची सर्रास आर्थिक लूट सुरु असून मोर्शी पासून केवळ 8 कि.मी.अंतरावर असलेल्या या अवैध टोल नाक्यातून मोर्शीकरांना मुक्ती देण्यात यावी. मोर्शी व आजूबाजूच्या खेड्यातील रहिवासी यांना अमरावती हे जिल्ह्याचे ठिकाण असल्यामुळे त्यांना वारंवार मोर्शीवरून अमरावतीला जाणे येणे करावे लागते. मोर्शी वरून अमरावती जवळपास 50 किलोमीटर एवढे अंतर आहे आणि या 50 किलो मीटरच्या अंतरावर नांदगाव आणि निंभी ही दोन टोल नाके जबरदस्तीने नियमबाह्य मोर्शीकरांवर लादण्यात आलेली आहे.

मोर्शी वरून निंभी( टोल नाका) हे गाव फक्त 8 किलोमीटर एवढे आहे आणि या 8 किलोमीटरसाठी मोर्शीकरांना व आजूबाजूच्या खेड्यात राहणाऱ्या व्यक्तींना आपल्या शेतात जाण्याकरिता सुद्धा 60 रुपये द्यावे लागत आहे. मोर्शी मध्ये राहणाऱ्या व आजूबाजूने खेडेगावात राहणाऱ्या शेतकऱ्याची अमरावती ही बाजारपेठ आहे. त्यामुळे त्यांना आपला शेतीविषयक माल हा निंभी व नांदगाव असे दोन टोल टॅक्स देऊन न्यावा व आणावा लागतो. परिणामी शेतकर्यांना मोठा भूर्दंड बसत आहे. त्यामुळे हा अन्यायकारक अवैध निंभीचा टोल 15 दिवसाच्या आत बंद करण्यात यावा. अन्यथा जनहितासाठी आम्हाला तीव्र स्वरूपाचे हल्लाबोल आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असा इशारा निंभी कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी ॲड. आशिष टाकोडे, निलेश रोडे, विशाल तीजारे, निलेश गनथडे, उल्हास पवार, रविंद्र कोवळे, अ.नईम, नूपम जावरकर, क्षिप्रा मानकर, अभिलाष व्यवहारे, पवन राउत, शिवा कपीले, हिरा भोसले यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अंजनगाव सुर्जी बसस्थानकाला भंगार बसेस चे ग्रहण

## विद्यार्थी व प्रवाशांचे हाल

## दर्यापूर आगाराकडून दुर्लक्ष

### सकाळच्या पहिल्या तीनही बसेस विविध कारणांनी ब्रेकडाऊन



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.20 )** – दर्यापूर आगाराअंतर्गत व्यवस्थापन असलेल्या येथील बसस्थानकात मुक्कामी असलेल्या बसेस वारंवार ब्रेकडाऊन होत असल्याच्या घटना वारंवार घडत असून वापरण्यासाठी कालबाह्य झालेल्या भंगार बसेसचा वापर करून प्रवाशांच्या जीवाशी खेळ होत आहे. शिवाय ऐनवेळी बस नसल्याने वा रस्त्यात बस बंद पडल्याने अनेकवेळा विद्यार्थ्यांची शाळा चुकल्याने व इतर प्रवाशांचे हाल होत असल्याचे प्रसंग घडत आहेत. याकडे राज्य परिवहन मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे अशी प्रवाशांकडून मागणी होत आहे.

अंजनगावसुर्जी बस स्थानकात सोमवारी (ता.20) ला आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सकाळी मोठी डोकेदुखी ठरणारा प्रसंग घडला. सकाळी सहा ला दर्यापूर कडे जाणारी पहिली बस स्टेअरींगचे ऑईल संपल्याने ते लॉक झाले. त्यामुळे बस जाग्यावरून हालवताही आली नाही.

त्यानंतर साडेसहा वाजता कोकर्डा मार्गे दर्यापूर जाणारी बस चे समोरचे चाक पंग्चर असल्याने ब्रेकडाऊन झाली आणि त्यानंतर 7.15 वाजता कापूसतळणी, खल्लार मार्गे अमरावती जाणारी बस सुद्धा चाक पंचर कारणाने ब्रेकडाऊन झाली.

या तीनही बस फेऱ्या ह्या महत्वाच्या बस फेऱ्या असून या द्वारे नोकरदार प्रवाशी व पास धारक विद्यार्थी मोठ्या संख्येने प्रवास करतात, त्यामुळे या तीनही बसेस नसल्याने बस स्थानकात मोठी गर्दी निर्माण झाली. पास धारक विद्यार्थ्यांना व प्रवाश्यांना इतर खाजगी प्रवाशी वाहनाने प्रवास करण्याची वेळ आली, ह्या बसेस येथील बसस्थानकातून मुक्कामी असल्याने जाणाऱ्या पहिल्या बस असल्याने या बसेसच्या भरवश्यावर अनेक विद्यार्थी व प्रवाशी बस स्थानकात येतात, परंतु अश्यावेळी त्यांच्यासाठी दुसऱ्या बस ची पर्यायी व्यवस्था करण्यासाठी बस स्थानकात बस उपलब्ध नसते, यामुळे प्रवाशांचे हाल होतात व त्यांना इतर अवैध प्रवाशी वाहनांचा असरा घ्यावा लागतो. ही दयनीय अवस्था येथील बसस्थानक व्यवस्थापनाची झाली आहे.

ब्रेक डाऊन होण्याच्या काही गंभीर बाबी असून स्टेअरींग ऑईल नसणे ही गंभीर बाब असून रस्त्यावर जर हा प्रकार झाला, तर अपघात होऊन नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या बाबीकडे महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे अशी प्रवाशांकडून मागणी होत आहे.

> “सोमवारी घडलेला प्रकार हा अपघाती असून हा केव्हाही घडू शकतो बसेसच्या प्रश्नाबाबत आम्ही वारंवार मागणी करतो, परंतु नवीन बसेस उपलब्ध होत नसल्याने अवस्था वाईट असली तरी जुन्या बसेसची किरकोळ दुरुस्ती करून त्याचा वापर करावा लागतो तसे केले नाही, तर अनेक फेऱ्या बंद ठेवाव्या लागण्याची पाळी येऊ शकते आता नवीन बसेसच्या मागणी नुसार त्यातील दहा बसेस येत्या महिन्याभरात आगाराला मिळणार असून तेव्हा काही अंशी प्रश्न होईल.
>
> **–अभिष बहुळकर, व्यवस्थापक आगार, दर्यापूर**

> “सद्यस्थितीत दर्यापूर डेपो द्वारे रोडवर चालणाऱ्या बसेस ह्या कालबाह्य झाल्या असून पर्त्याची डागडुजी करून चालवल्या जात आहेत. या बसेस चे इंजिन सुद्धा योग्यरीत्या काम करत नसून यातून सुद्धा रस्त्यात ब्रेकडाऊन होण्याचे प्रकार घडतात. चालक, वाहक जीवावर उदार होऊन आपले कर्तव्य बजावत असून प्रवाशांच्या जीवावर बेतणारा हा विषय आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.
>
> **एक प्रवाशी**

# मेळघाट हाट येथील 25 जानेवारीपर्यंत खादी महोत्सव

**अमरावती** – प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ व महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने बस स्टॉड समोरील सायन्सकोर मैदान येथील मेळघाट हाट येथे खादी महोत्सवाला सुरवात झाली असून 25 जानेवारी 2025 पर्यंत हा महोत्सव चालणार आहे. अमरावतीकरांनी मोठ्या संख्याने खादी महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# दोन वर्षातील बांधकामाची चौकशी करून दोषीवर कडक कारवाई करा!



**सुशील बेले यांची मागणी**

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.20 )**– दोन वर्षा अगोदर तालुक्यात व शहरात विविध विकासात्मक कामे झाली. त्यामध्ये काँक्रीट रस्ते, बंदिस्त नाली, पाणंद रस्ते व इतर कामांचा समावेश आहे. ही सर्व कामे निकृष्ट दर्जाची झाली असून दोन महिन्यातच रस्त्याला भेगा पडलेल्या आहेत. तर काही रस्ते उखडलेले आहेत. त्याचबरोबर पाणंद रस्तेसुद्धा निकृष्ट दर्जाचे बांधण्यात आले आहे. या सर्व कामाची बांधकाम विभागामार्फत चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी आक्रोश जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष सुशील बेले यांनी एका लेखी निवेदनाद्वारे उपकार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,वरुड यांच्याकडे केली आहे.

मागील दोन वर्षाच्या काळात वरुड शहरातच नव्हे तर संपूर्ण तालुक्यात विविध विकासात्मक कामे झाली. त्यामध्ये काँक्रीट रस्ते, बंदिस्त नाल्या, पाणंद रस्ते, खडीकरण, डांबरीकरण रस्ते असे एक ना अनेक कामे करण्यात आली. ही संपूर्ण कामे सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत, तर काही जिल्हा परिषद अंतर्गत करण्यात आले आहे. या संपूर्ण कामाची प्रतवारी निकृष्ट दर्जाची असल्यामुळे यामध्ये ठेकेदार व अधिकारी यांच्या संगनमताने झाले असावे अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. यातील बहुतांश कामे हे सुरुवातीपासूनच निकृष्ट दर्जाचे झाले आहे. तर काही रस्त्याला भेगा पडल्या आहेत. त्यामुळे या कामांमध्ये निश्चितच भ्रष्टाचार झाला यात शंका नसल्याचे बेले यांचे म्हणणे आहे. त्यामुळे शासनाचा निधीचा गैरवापर करून अधिकारी व कंत्राटदारांनी स्वत:चे खिसे भरण्याचा गोरखधंद्याला कुठेतरी आळा बसावा म्हणून आक्रोश जनशक्ती संघटना ही रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा संघटनेचे अध्यक्ष सुशील बेले यांनी उपकार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिलेल्या निवेदनात केला आहे. आता या तक्रारीची सार्वजनिक बांधकाम विभाग दखल घेऊन या प्रकरणाची थर्ड पार्टी ऑडिट करून दोषीवर कारवाई करणार का? याकडे मात्र सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# झेनिथ कॉन्सेप्ट स्कूलच्या विद्यार्थ्यांची जागतिक पातळीवर कामगिरी



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.20 )**– तालुक्यातील तळणी येथील झेनिथ कॉन्सेप्ट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनच्या वतीने सन 2024-25 मध्ये घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ओलंपियाड परीक्षेत अपूर्व यश मिळवून शाळेचा, पालकांचा आणि संपूर्ण समाजाचा अभिमान वाढविला आहे. उल्लेखनीय यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये महेश्वरी सागर कथले (इयत्ता 1) आंतरराष्ट्रीय प्रथम क्रमांक ङ्क जागतिक स्तरावरची अभूतपूर्व कामगिरी, अबीर संगोले (इयत्ता 1) गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स ङ्क चमकदार कामगिरी, वेदिका सागर कथले(इयत्ता 3) गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स आणि शाळेत प्रथम क्रमांक,अनन्या रिनेश तट्टे (इयत्ता 3) गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स आणि शाळेत द्वितीय क्रमांक, रेणु कल्पेश अमरुते (इयत्ता 2) गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स आणि शाळेत द्वितीय क्रमांक, श्रेयश निलेश डोळस (इयत्ता 2) गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स आणि शाळेत तृतीय क्रमांक, आराध्या हृषिकेश गडेकर (इयत्ता 2)गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स आणि शाळेत प्रथम क्रमांक, रुही हितेश साबू (इयत्ता 3) गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स, गीतीका प्रताप चिखले (इयत्ता 4) गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स, यशस्वी रामचंद्र सिरसकर (इयत्ता 4) गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स, समर्थ संजय साबळे (इयत्ता 4) गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स, यशश्री प्रवीण धोटे (इयत्ता 5) गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स यांचा समावेश आहे.

या अभूतपूर्व यशामागे शाळेच्या समर्पित टीमचे नेतृत्व आणि पाठिंबा आहे, त्यामध्ये संचालक डॉ. दीपाली देशमुख, मुख्याध्यापक दिनेश फंदे, मार्गदर्शक मिस पूजा केचे, समन्वयक मिस पूजा झंवर, आणि पालकांचा पाठिंबा इत्यादींचा समावेश आहे.



# खानापूर च्या निवासी अंध विद्यालय ने गाजविली जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धा

**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड,( दि.20 )** – दिव्यांगाच्या जिल्हा स्तरिय क्रीडा स्पर्धा नुकत्याच 15 ते 17 जानेवारी 2025 ला अमरावती ला हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे पार पडली. ज्यामध्ये मोर्शी तालुक्यातील खानापूर येथील 16 विद्यार्थी व विद्यार्थीनी नी भाग घेतला. त्यापैकी 3 विद्यार्थ्यांनी 10 सुवर्ण, तर 2 विद्यार्थ्यांनी रजत तर 2 विद्यार्थ्यांनी कास्य पदक पटकाविले. पुनम कुमरे हिने गोळा फेक तसेच 100 मीटर धावणे प्रकारात सुवर्ण, रामनाम उईके याने लांब उडी मध्ये सुवर्ण पदक पटकावले, तर मिथिलेश उईके 100 मिटर धावणे, युवराज काकडे गोळा फेक मध्ये, फुलवंती भलावी लांब उडीमध्ये, आशा जावरकर 50 मिटर धावणे, अनिका पाटील 25 मिटर धावणे, गोपाल जावरकर 25 धावणे, अनुज धुर्वे 50 धावणे, शिवकुमार धुर्वे पासिंग द बॉल, कांता धोटे पासिंग द बॉल, तसेच अनुष्का उईके 25 मिटर लावणे यांनी रजत पदक पटकाविले. या यशाचे श्रेय विद्यार्थी शाळेचे संस्थापक, मुख्याध्यापक तसेच शिक्षकांना देतात.

# पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या क्रीडा सप्ताहाला जल्लोषात प्रारंभ



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )**– पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये क्रीडा सप्ताहाचा जल्लोषात प्रारंभ झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन म्हणून यावेळी पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एम.जावंधिया यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी समूहातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक मार्चपास्ट आणि प्रात्यक्षिकांनी झाली. विद्यार्थ्यांनी दाखवलेला उत्साह आणि शिस्तबद्धता पाहून उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले.

क्रीडा सप्ताहात विद्यार्थ्यांसाठी विविध मैदानी आणि इनडोअर खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये क्रिकेट, कबड्डी, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बास्केटबॉल, टेबल टेनिस, कॅरम आणि बुद्धिबळ यांसारखे खेळ सहभागी आहेत. पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एम.जावंधिया यांनी उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, क्रीडा ही केवळ आरोग्यासाठी महत्वाची नाही, तर ती व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन आहे. खेळांमुळे सहकार्य, नेतृत्वगुण, आणि संघभावनेचा विकास होतो. कार्यक्रमात पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे स्पोर्ट शिक्षक प्रा.संदीप ठाकरे आणि प्रा.सुयोग तायडे यांनी विद्यार्थ्यांना खेळांशी संबंधित नियमांचे महत्त्व पटवून देत त्यांचे मनोबल वाढविले. या क्रीडा सप्ताहाचे प्रमुख उपस्थित मान्यवरांमध्ये आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एल.भुतडा, फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.डी.बी.रुईकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे, नर्सिंग महाविद्यालयाचे प्रा.सुज्ञान गवई, बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए. बी.देशमुख, आर्किटेक्चर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डब्ल्यू. देशमुख, तसेच उपप्राचार्य डॉ. मो. झुहेर, आणि स्टुडंट वेल्फेअर डीन डॉ. एस. के. नंदा यांचा समावेश होता. सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या मोठ्या उपस्थितीत कार्यक्रम यशस्वी झाला. क्रीडा सप्ताहाच्या समारोपादिवशी विजेत्यांना सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

# प्रमोद पोकळे संघाची राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धेसाठी निवड

### नाशिक येथे 29 व 30 जानेवारीला आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.20 )** – महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबईच्या वतीने 29 व 30 जानेवारी 2025 रोजी 'राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धा' कामगार कल्याण भवन, सातपूर नाशिक येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील विदर्भ, खानदेश, मराठवाडा, कोकण व पश्चिम महाराष्ट्र या भागांतून एकंदर 38 कामगार भजनी संघ सहभागी होणार असून अमरावती गटाचे प्रतिनिधित्व प्रमोद पोकळे व त्यांचा संघ करणार असल्याने त्यांना व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना शुभेच्छा देऊन सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

प्रमोद पोकळे यांच्या संघात तबलावादक प्रशांत दुधे, मृदुंगवादक प्रज्वल वांगे, हार्मोनियम वादक निलेश बिरहा, वीणावादक प्रवीण रुमणे तर टाळ व सहगायनाची साथ राजेंद्र इंगोले, सुभाष सुने, सुनील तायडे, गणेश खंडार, प्रज्वल हिरडे, पवन इंगोले, अनुप सुने व राजेश टारपे इत्यादी साथीदार कलावंत करणार आहेत.

राष्ट्रपिता महात्मा गांधी कार्यस्मृति सप्ताह अंतर्गत 8 ऑक्टोबर 2024 रोजी अमरावती येथे संपन्न झालेल्या गटस्तरीय कामगार भजन स्पर्धेत ललित कला भवन, अमरावतीसह कामगार कल्याण केंद्र, गांधी चौक, राधानगर, शेगाव नाका, बडनेरा, संभाजीनगर अचलपूर, धामणगाव रेल्वे, मूर्तिजापूर, मोर्शी व यवतमाळ येथील भजनी संघांमधून प्रमोद पोकळे व संघाने प्रथम क्रमांक पटकावला, त्यामुळे आता त्यांची निवड राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धेसाठी करण्यात आली आहे.

# जनता विद्यालय येथे नवनिर्वाचित कार्यकारीणीचा सत्कार



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी( दि.20 )**– जनता माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात मुख्याध्यापक विनोद मुगल तसेच पर्यवेक्षक गजेंद्र अवघड सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने न्यु एज्युकेशन सोसायटी बडनेरा द्वारे संचालीत संस्थेच्या नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकारिणी सत्कार सोहळा दि.16 जानेवारी रोजी पार पडला. या कार्यक्रमास संस्थेचे संस्था अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. हेमंत देव, विशेष प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष राजेश टारपे व ॲड.आनंदराव इंगोले तसेच समन्वय समिती अध्यक्ष डॉ. बळीराम ग्रेसपुंजे, रामेश्वर लाड, महादेवराव चकुले, सुरेश मेठी, सोमेश्वरराव इंगोले, रमेशरावजी सुने, देवेंद्र जोशी, सोमेश्वर मोरे, अरुण निमकर, मारोतराव भुंते, माणिकराव अंबाडकर, विवेक पांडे, अशोकराव तायडे, संस्था सचिव तथा गांधी विद्यालय प्राचार्य अनिता सदाफळे, प्राचार्य विनोद मुगल, मुख्याध्यापक अशोकराव ठाकरे, पर्यवेक्षक गजेंद्र अवघड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक विनोद मुगल यांनी कार्यक्रमाचे यांनी केले. त्यानंतर सत्कारमूर्ती नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. हेमंत देव तसेच उपाध्यक्ष राजेश टारपे यांचा मुख्यध्यापक विनोद मुगल यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यानंतर कार्यकारीणी मंडळीतील सर्व सदस्यांचा पर्यवेक्षक गजेंद्र अवघड तसेच सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शेवटी कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. हेमंत देव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सर्व शिक्षक वृंदाना उत्कृष्टपणे आपली जबाबदारी पार पाडावी तसेच विद्यार्थ्यांचा शाळेचा जास्तीत जास्त विकास व्हावा यादृष्टिकोनातून प्रयत्न करण्यास सांगितले.



# सामूहिक विवाह सोहळ्यात 8 जोडपे विवाहबध्द

### सिरातुम मुस्तकिम सोसायटीकडून आजवर 100 जोडप्यांचा लावला विवाह

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.20 )**– सिरातुम मुस्तकिम मल्टीपर्पज सोसायटीने हिरापुरा गेट येथील कौकब नवाब यांच्या सहारा लॉनमध्ये, रविवारी 8 व्या सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले होते. या आयोजन 8 जोडप्यांना विवाहबध्द केले. उलमांचा उपस्थितीत हा सोहळा पार पडला. सिरातुम मुस्तकिम मल्टीपर्पज सोसायटीचे अध्यक्ष मोहम्मद साबिर उल कादरी यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षी सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन केले जाते. गरजू कुटुंबांना आधार देण्यासाठी सोसायटीकडून आजवर जवळपास 100 जोडप्यांचे विवाह साधेपणाने पार पाडले गेले आहे, ज्यामूळे लाखो रुपयांची बचत झाली आहे. सामूहिक विवाह सोहळ्याला शहरातील प्रतिष्ठित उलमा आणि समाजसेवकांची उपस्थिती लाभली. या वेळी मंचावर 8 वर विराजमान झाले होते. शेकडो नागरिकांनी सोहळ्यात हजेरी लावली. प्रमुख उपस्थितीत शहर खतीब अल्हाज सय्यद एजाज हुसैन, महमूद उर्फ म्हमदू राजा, रहीम खान रहम्मू, मौलाना कफील (परतवाडा), मौलाना कलीम (अचलपूर), हाफिज गुलाम हुसैन, हाफिज शहजाद, साकिब रजा, हाफिज सलमान, हाफिज तजीम, हाफिज अदनान, छोटू (सदर मस्जिद धोतरखेड़ा), सईद (धोतरखेड़ा), हाफिज जुन्नुरैन, मास्टर सय्यद कलीम (पणज), अब्दुल मुबारक (रिध्दपूर), सत्तार (रिध्दपूर), अफरोज खान (रिधपूर), मुस्तफा जागीरदार, शकील, रम्मू, सलीम शाह (परतवाडा), मतीन (समाजसेवक) यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### वधुंना भेटवस्तु, पाहुण्यांना भोजन

सोसायटीच्या वतीने वधुंना आवश्यक भेट प्रदान करण्यात आली. तसेच उपस्थित पाहुण्यांना भोजनाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी काँग्रेस अध्यक्ष बबलू देशमुख यांनी सोहळ्याला हजेरी लावून वधू-वरांना शुभेच्छा दिल्या.

### सोसायटीचा उद्देश आणि पुढील योजना

सिरातुम मुस्तकिम सोसायटीचे अध्यक्ष मोहम्मद साबिर उल कादरी यांनी सांगितले की, आतापर्यंत 100 जोडप्यांचे विवाह यशस्वीपणे पार पडले आहेत. समाजातील गरजू कुटुंबांना आधार देणे आणि खर्चिक विवाहप्रथांना आळा घालणे हा आमचा उद्देश आहे. सामूहिक विवाह सोहळे सामान्यांपर्यंत पोहोचवून फाजील खर्च थांबवण्याचे आमचे प्रयत्न सुरू राहतील, असे त्यांनी सांगितले. या कार्यात समाजसेवकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले असून त्यांनी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनात मोलाचा वाटा उचलल्याबद्दल आभार मानण्यात आले.

**FORM 9**
(Rule No.24)
(Notice to any person - General Form)
**IN THE LABOUR COURT, AMRAVATI**
Before Shri S.S.Patil, Judge, Labour Court, Amravati
**WCA (Cond.Delay) No.6/2020**
Bansi S/o. Sanu Dahikar & One -- Applicants
**-- VERSUS --**
Umesh S/o. Hira Kasdekar & Ors. -- Non-Applicants
At Post. Rohini Kheda, Tehsil Dharni, District Amravati.
**NOTICE**
Umesh S/o. Hira Kasdekar & Ors. Please take notice, whereas your presence before this Court is considered essential in the proceeding you are called upon to appear before this Court on 31.01.2025 at 10.30 A.M. or at such time immediately thereafter according to the convenience of the **Court Labour Court, Amravati.**
**Encl.: Nil**
O.W.No./1364/2022
Labour Court, Amravati
Opp.Collectorate, Old District
Court Premises, Camp,
Amravati-444602
Date: 16.11.2022
Court Seal
**By Order,**
**Sd/-**
**Clerk of Court**
**Labour Court,**
**Amravati.**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार सुरेखा देवचंद इंगळे रा. अंजनगांव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील रहिवाशी आहेत. त्यांच्या स्वत:च्या जन्माची नोंद नगर परिषद अंजनगांव येथे रजिस्टरमध्ये नसल्याने त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माच्या नोंदीचे आदेश होण्याबाबतचा विनंती अर्ज या कार्यालयात दि. २०/०८/२०२४ रोजी सादर केला आहे.


त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरून जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे. सुरेखा देवचंद इंगळे यांचा जन्म अंजनगांव येथे २४/५/१९७५ रोजी झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत. अन्यथा ३० दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कोर्ट शिक्का

( रविंद्र काळे )
निवासी नायब तहसीलदार
अंजनगांव सुर्जी

# अचलपूरच्या दंतचिकित्सकाने टाकली महाराष्ट्राच्या पक्षी सुचित भर!

## पाण-तीरचिमणी पक्षाची नोंद



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा,( दि.20 )**– तीर चिमणी (pipit)या जातीतील प्रामुख्याने दक्षिण युरोपच्या उंच पर्वतीय प्रदेश व पूर्वेकडे आशियातील चीन मध्ये प्रजानन व अधिवास असणारी पाण-तीरचिमणी(वॉटर पिपिट) nthus spinoletta(शास्त्रीय नाव) या पक्षाची नुकतीच नववर्षाच्या सुरुवातीलाच महाराष्ट्राच्या पक्षी सूचित भर पडली.हिवाळ्यात कमी अंतराचे स्थलांतर करणारे हे पक्षी असून भारतात या पक्षांच्या नोंदी उत्तरेतील जम्मू-कश्मीर,हरियाणा,दिल्ली व पंजाब तसेच पश्चिमेत राजस्थान व कच्छ-गुजरात तसेच उत्तराखंड व उत्तर प्रदेशात झालेल्या आहेत. मात्र महाराष्ट्र व दक्षिणेकडील राज्यात याआधी या पक्षाची नोंद झाली नव्हती.

परतवाडा येथील दंतचिकित्सक डॉ.रणजीत चित्रकार या पक्षी निरीक्षकाने ही नोंद सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या अचलपूर तालुक्यातील 'जांभळा' तलावावर केली. आपल्या दैनंदिन पक्षीनिरीक्षणा दरम्यान प्रथम दर्शनी ही महाराष्टात सामान्यपणे आढळणाऱ्या तीर चिमणीच्या इतर जातीतील असावी असे त्यांना वाटले. मात्र त्यांनी घेतलेली छायाचित्रे व नोंदविलेले निरीक्षण या आधारे अमरावती येथील अनुभवी पक्षी निरीक्षक श्री.मनोज बिंड व शुभम गिरी व प्रशांत निकम यांनी हा पक्षी 'पाण तीरचिमणी'च असल्याची खातरजमा केली. उत्तरेकडील कडाक्याची थंडी मुळे कदाचित यावर्षी सातपुडा पर्वत रांगा ओलांडून पायथ्याशी असलेल्या एका छोट्या तलावावर या पक्ष्याची जोडी आली असावी असा पक्षीतज्ञाचा अंदाज आहे.या आधीही तालुक्यातील 'गोंडविहीर', 'उपातखेडा' व इतर काही जलाशयांवर दुर्मिळ पक्षांच्या नोंदी घेण्याचे कार्य डॉ. चित्रकार यांनी काम केलेले आहे. जगभरातील पक्षी निरीक्षक आपल्या नोंदी 'ई-बर्ड' या संकेतस्थळावर नोंदवितात.याआधी महाराष्ट्राच्या पक्षी सूचीमध्ये पक्षी निरीक्षकांनी '580' विविध जातींच्या पक्षांच्या नोंदी केलेल्या होत्या,यात अजून एकाची भर पडली. महाराष्ट्राच्या समृद्ध पक्षी सुचीत नववर्षाच्या सुरुवातीलाच एका नवीन पक्षाची नोंद मंजूर झाल्याने पक्षी निरीक्षकांनी आनंद व समाधान व्यक्त केले. महाराष्ट्र पक्षी संघटनेचे अध्यक्ष डॉ.जयंत वडतकर यांनी देखील डॉ.चित्रकार यांचे या उपलब्धीबद्दल अभिनंदन केले.